LOKNETE DR.BALASAHEB VIKHE PATIL (PADMABHUSHAN AWARDEE) Establishment 4 August 2004
PRAVARA RURAL EDUCATION SOCIETY'S

# ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ALKUTI

ID.No. PU/AN/ACS/78/2004
College code No.757
A/P. Alkuti, Tal. Parner, Dist. Ahmednagar. Pin-414305



- Phone: (02488) 250457

Email ID : Principal.acsalkuti@pravara.in

# Self Study Report : 2023 (1 st Cycle)




## Criteria - 3 — Reaserch, Innovation & Extention

## KEY INDICATOR : 3.3 — Research Publications and Awards

**3.3.2 Number of books and chapters in edited volumes/books published and papers published in National/ international conference proceedings per teacher during last five years**

# INDEX 2019

| Sr. No. | Name of the teacher | Title of the book/chapters published | Title of the paper | Name of the conference | National / International | ISBN /ISSN number of the proceeding | Page No. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Kavade K.B. | Contribution of Shahu Maharaj, Mahatma Phule and Dr. Babasaheb Ambedkar at International Level | *Mahatma Jotiba Phule Yanche Shikshan kshetratil Yogdan* | 15th International Interdisciplinary Conference | International | 978-93-87628-42-7 | 3-9 |
| 2. | Kavade K.B. | Desh Videshatil Sahityik, Samaj Sudharak,Sanshodhak Ani shasardnya Yanche Yogdan | *Padmabhushan Dr. Balasaheb Vikhe Patil Yanche Shaikshnik Yogdan* | 16th International Interdisciplinary Conference | International | 978-93-87628-44-1 | 10-17 |
| 3. | Kavade K.B. | 'The Cultural Contribution of Sanyukta Maharashtra Movement and Goa Liberation Movement at National and international Levels' | Sahityik Annabhau Sathe Yanche Sanyukt Maharashtratil Chalvalitil Yogdan | 20th International Interdisciplinary Conference | International | 978-93-87628-74-8 | 18-25 |
| 4. | Chate A.K. | Printing Area | 19 Shatkatil Maharashtratil Krantikari Chalval Ani Krantikaranche Kary | | International | 2394-5303 | 26 |

15th INTERNATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE

१५वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

भाग दोन



# 'Contribution of Shahu Maharaj, Mahatma Phule and Dr. Babasaheb Ambedkar at National and International Levels'

# 'जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान'

संपादक

डॉ. स्नेहल तावरे

डॉ. शोभा इंगवले

२०) महात्मा फुले यांचा 'स्त्री' शिक्षण विषयक दृष्टिकोन — डॉ. केतकी भोसले /८५
२१) महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषि-औद्योगिक क्षेत्रातील योगदान — डॉ. सदाशिव पाटील /८९
२२) आधुनिक कालखंडातील युगपुरुष महात्मा फुले — डॉ. रावसाहेब ननावरे /९३
२३) फुले - आंबेडकर विचारधारा : काळाची गरज — डॉ. अशोक शिंदे /९७
२४) कृतिशील सुधारक आणि विचारवंत : जोतीराव फुले — डॉ. धनंजय लोखंडे /१०१
२५) आदर्श जीवनाचा वस्तुपाठ : सार्वजनिक सत्यधर्म — डॉ. रेश्मा दिवेकर /१०५
२६) समाज सुधारणा व पुनर्रचना करण्यात महात्मा जोतिबा फुले आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची समांतरता — डॉ. पल्लवी मेश्राम /१०९
२७) महात्मा फुले यांच्या साहित्यवाचनाचा बी.एड. विद्यार्थिनी - शिक्षिकांवरील परिणाम : एक अभ्यास — डॉ. उषा मोरे /११३
२८) महात्मा जोतीराव फुले यांचे 'तृतीयरत्न' नाटकातील सामाजिक स्थिती व आजची सामाजिक स्थिती : एक अभ्यास — डॉ. सुरेखा भाग्यवंत /११६
२९) महात्मा फुले यांचे आर्थिक विचार — डॉ.पल्लवी भावसार /१२१
३०) जागतिक स्तरावर महात्मा फुले यांची शैक्षणिक क्रांती — डॉ.उज्ज्वला हातागळे /१२५
३१) जागतिक स्तरावरील महात्मा फुले यांचे योगदान — प्रा. संदीप उल्हाळकर /१२९
३२) समाज परिवर्तनात महात्मा फुले यांच्या साहित्याचे योगदान — प्रा. ए. बी. भावसार /१३३
३३) सामाजिक सुधारणेचे जनक महात्मा फुले — प्रा. टी. आर. बोराडे /१३७
३४) महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य व समाजपरिवर्तन — प्रा. प्रशांत जाधव /१४०
३५) महात्मा जोतिबा फुले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान — प्रा. कुंदा कवडे /१४४
३६) जागतिक स्तरावरील महात्मा जोतीराव फुले यांचे योगदान — प्रा. विजया सुकाळे /१४८
३७) युगप्रवर्तक महात्मा जोतिबा फुले — प्रा. माया धुप्पड /१५२

# महात्मा जोतिबा फुले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान

प्रा. कुंदा बाळासाहेब कवडे
भ्रमणभाष : ९६२३४६३९२९

महात्मा जोतिबा फुले यांचे शिक्षणाविषयक विचार हे महत्त्वाचे आहेत. शिक्षणविषयक विचार हे शाळा महाविद्यालयातून अभ्यासक्रमातून प्रकट होणारे आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रिसुत्रीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे म. फुले महापुरुष होते. म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचारांचे होते. त्यांनी मॅकॉलेच्या खलित्यास कडाडून विरोध केला. 'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे'. या विचारास फुलेंचा विरोध होता, कारण इंग्रजांचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालचा वर्ग शिकावा यावर होता. 'प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण द्यावे' 'आधी कळस मग पाया असे न होता आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षणप्रणाली असण्यावर म. फुलेंचा आग्रह होता. म्हणजेच 'प्रथम उपेक्षित समाजाला शिक्षण दिला पाहिजे आणि नंतर अपेक्षितांना शिक्षण द्यावे' यावर फुले यांनी भर दिला.

महात्मा फुलेंचे शिक्षणविषयक विचार

- स्त्रीशिक्षणाचा पाठपुरावा
- प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत.
- प्रशिक्षित शिक्षकांची तरतुद करणे.
- प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे.
- ग्रामीण भागातील मुलांमुलींचे शिक्षण.
- व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण.
- त्रिभाषा सूत्राचा अवलंब.
- शिक्षणविषयक ज्ञान व विचार

**स्त्रीशिक्षणाचा पाठपुरावा –**

ज्या काळात म. जोतिबा फुले जन्माला आले तो काळ अगदी पारतंत्र्याचा काळ होता. पुरुषी प्रधान संस्कृतीमुळे स्त्रीला शिक्षण घेता येत नव्हते. 'चुल आणि मूल' या बंधनात ती अडकली होती. तिची पारंत्र्यातून सुटका व्हावी. तीला शिक्षण घेता यावे. तीला स्वतःच्या पायावर उभे रहाता यावे. तिला मोकळा श्वास घेता

याचा स्त्रीसाठी शिक्षणाची दारे कायमची उघडली जावी, म्हणून म. फुले यांनी स्त्री शिक्षण मोहिम सर्वप्रथम हाती घेतली. सक्षम स्त्री घडविण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखून म. फुले यांनी आपल्या पत्नीस शिक्षण देऊन आद्य शिक्षिका म्हणून कार्यास सुरुवात केली. स्त्री शिक्षणाची मोहिम हाती घेतली. म्हणूनच आज तळागाळातील प्रत्येक स्त्री ही घराबाहेर पडून स्वतःच्या पायावर उभी आहे. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात ती उच्च पदावर आहे. हे केवळ म. फुलेंमुळेच.

**प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत –**

म. जोतिबा फुले हे प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असावे या विचारांचा पुरस्कार करणारे प्रथम भारतीय नागरिक होते. प्रत्येक बालकाला शिक्षण मिळावे पाहिजे. तो त्याचा हक्क आहे. म्हणून त्यांनी प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे आणि मोफत केले. १९ ऑक्टोबर १८८२ रोजी मागणी हंटर आयोगापुढे मांडली. नीती आणि सद्वर्तनाच्या दृष्टीने कितीतरी चांगले लोक शिकून तयार होताना मुळीच अडचण येणार नाही. या विचारातून त्यांनी शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यावर भर दिला..

**प्रशिक्षित शिक्षक तरतूद –**

म. फुले यांच्या मते, शिक्षण जर मोफत आणि सक्तीचे झाले तर शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या वाढेल हे फुले यांनी ओळखले होते. शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या वाढली तर, त्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे हेही महत्त्वाचे आहे त्यासाठी प्रशिक्षित शिक्षक देखील आवश्यक आहे. त्याकरिता प्रथम आवाज उठविणारे म. फुले हे एकमेव व्यक्ती होते. प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया आहे. या स्तरावरील शिक्षण उत्तम दर्जाचे असावे. यावर भर दिला.

**प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे –**

प्राथमिक शिक्षण हे तळागाळातील मुलांमुलींना मिळावे. प्राथमिक शिक्षण हे खालच्या वर्गास दिले जावे. उच्च शिक्षणाकडे कमी व ग्रामीण जनतेच्या प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणातून उद्याची उज्जल भावी पिढी घडणार आहे हे महात्मा फुले यांना लक्षात घेतले. म्हणून आज जे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले त्यामागे म. फुलेंचे विचार असलेले दिसून येतात. आज आपल्या देशात प्राथमिक शिक्षणाची परिस्थिती लक्षात घेतली तर अनुभवाने कमी असलेले प्राथमिक स्तरावर ज्ञानदानाचे काम करतात. मुलांना संस्काराचे धडे हे प्राथमिक शाळेतच दिले जातात. म्हणून संस्कारक्षम पिढी जर घडवायची असेल तर प्राथमिक शिक्षण अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्वक देणे हे काळाची गरज आहे. त्याच दृष्टिकोनातून म. फुले यांनी आपले योगदान दिले.

**ग्रामीण भागातील मुलामुलींचे शिक्षण –**

ग्रामीण भागात राहत असणारा बहुजन समाज मोठ्या प्रमाणात आहे. हे म. फुले यांनी ओळखले होते. त्यांच्या शिक्षणाची काळजी म. फुले यांना अधिक

वाटत होती. २ मार्च १९८८ मध्ये म. फुले म्हणाले होते की, आपली बहुतांश जनता खेड्यात निवास करते. तेव्हा शासनाचे ग्रामीण लोकांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरविले जावे. म्हणूनच आज शिक्षणाची ज्ञानगंगा खेडोपाड्यात पोहचली आहे. याचे सारे श्रेय म. फुले यांनाच जाते.

**राष्ट्रनिर्माणासाठी शूद्रांना शिक्षण –**

आपल्या देशात बहुजन समाज हा अज्ञानी व अडाणी आहे. त्याचा जर उद्धार करावयाचा असेल तर शिक्षण हा एकमेव उपाय आहे. शूद्रांना शिक्षण मिळाल्या शिवाय आपले राष्ट्र बनू शकत नाही. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली पाहिजे. यावर म. फुले यांनी अधिक भर दिला.

**शिक्षणप्रणालीत आमुलाग्र बदल –**

शिक्षण पद्धती ही बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित करणारी होती. म्हणून शिक्षणप्रणाली बदलली पाहिजे यावर म. फुले यांनी भर दिला. मानवी जीवन हे जर सुखी आणि समृद्ध घडवायचे असेल तर उद्योगी जीवनोपयोगी शिक्षण देण्यात यावे, म्हणून शिक्षण प्रणालीत बदल घडवून आणला.

**त्रिभाषा सुत्राचा अवलंब –**

म. फुले यांनी कोठारी आयोगाच्या अगोदर त्रिभाषा सुत्राचा अवलंब शिक्षणात करावा यावर अधिक भर दिला होता. त्यानंतर कोठारी आयोगाच्या त्रिभाषा सुत्रास मान्यता दिली.

**शिष्यवृत्ती व वसतीगृहाची सुविधा –**

जनसामान्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा ह्यासाठी खेडोपाड्यातील जनतेला शिक्षण घेता यावे म्हणून वसतिगृहाची व्यवस्था करण्याची कल्पना म. फुले यांनी मांडली आणि गरीब व होतकरू मुलांसाठी शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा देण्यावर भर दिला. म्हणूनच मुलेमुली मोठ्या प्रमाणात शिक्षण घेतात.

**शिक्षणविषयक ज्ञान व विचार –**

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. शिक्षणाशिवाय माणसाची प्रगती होणार नाही. म्हणून त्यांनी शिक्षणावर अधिक प्रकाश टाकला आहे. शिक्षण हे फक्त एका व्यक्तिने न घेता सर्वांना शिक्षण मिळावे, शिक्षणाचा प्रसार होऊन ज्ञान व विचारांची वृद्धी व्हावी यासाठी म. फुले यांनी योगदान दिले.

म. फुले यांनी शिक्षणाविषयक योगदान देत असताना सत्यशोधक समाजाची स्थापना करून स्त्रियांसाठी तसेच मागासलेल्या अनाथांच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून दिली. समाज परिवर्तनाचे काम करताना स्वतःच्या घरादाराचाही विचार न करता काम केले आणि म्हणूनच आज समाज मानाने शिक्षण घेताना दिसतो. महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या खालील ओळी आहेत.

''विद्येविना मति गेली।
मतीविना नीति गेली।

नीतीविना गति गेली।
गतीविना वित्त गेले।
वित्तविना शुद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।''

बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. यांनी इ.स. १८४८ रोजी पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली. महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली. तसेच अस्पृष्य मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळपेठेत इ.स. १९५२ मध्ये शाळा स्थापन केली. त्यांच्या या कार्याला सनातन्याकडून सतत विरोध होत असे. पण जोतीराव आपल्या भूमिकेवर ठाम असत. जोतीरावांनी पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. स्वतंत्र्यपणे स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते. म. फुले हे मराठी लेखक, विचारवंत आणि समासुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली. शेतकरी व बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. म्हणून त्यांना महात्मा ही उपाधी बहाल केली.

म. फुले यांना सामाजिक व आर्थिक समतेवर आधारलेला शोषण विरहित समाज निर्माण करायचा होता. म्हणून त्यांनी शिक्षणासारखे पवित्र कार्य हाती घेतले. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे श्री शाहू मंदिर महाविद्यालय पुणे आणि स्नेहवर्धन रिसर्च इन्टिट्युट यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान' याविषयावर आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद आयोजित केली. या आंतरराष्ट्रीय आंतर विद्याशाखीय परिषेदत मी महात्मा फुले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान हा शोध निबंध टाकण्याची संधी मला मिळाली. हा निबंध म्हणजे 'महात्मा फुले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान' यावर एक छोटेसे धाडस मी केले आहे. त्यांचे शिक्षणविषयक कार्य एका शोधनिबंधातून संपणारा विषय नाही. कितीही लिहिले तरी ते अपुरे होणार आहे.

## संदर्भ सूची –

१) महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य – प्रा. तानाजी ठोंबरे, लोकवाङ्मय गृह प्रकाशन
२) महात्मा ज्योतीराव फुले – श्री. पी. सि. पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, श्री. सू. द्वा. देशमुख प्रकाशन
३) महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांचे कार्य – लेखक विठ्ठलराव भागवत
४) महात्मा जोतीराव फुले जीवन आणि कार्य – लेखक दिलीप मनेकर

ꕥꕥ

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे
आणि स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्युट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय १५ वी परिषद



'जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान'
या परिषदेत पुस्तकाचे प्रकाशन करताना डावीकडून सुषमा शिंदे, दुबई, डॉ. मधुमती कौन्जुल, मॉरिशस,
डॉ. स्नेहल तावरे, डॉ. सदानंद मोरे, श्री. शशिकांतभाऊ सुतार, सौ. प्रमिलाताई गायकवाड,
प्राचार्य डॉ. शोभा इंगवले, डॉ. लक्ष्मी झमन, मॉरिशस, श्री. विश्वदीप करमचंद, मॉरिशस



मा. श्री. उल्हासदादा पवार यांचा सत्कार करताना...



मा. डॉ. नीलम गोऱ्हे यांचा सत्कार करताना...



परिषदेच्या निमित्ताने आलेले सर्व निमंत्रित.

ISBN 978-93-87628-42-7
9 789387 628427
Price ₹ 220/-$3

स्नेहवर्धन प्रकाशन

सोळावी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश - विदेशातील साहित्यिक, समाज सुधारक, संशोधक आणि शास्त्रज्ञ यांचे योगदान

## भाग चार




संपादक
डॉ. स्नेहल तावरे
डॉ. मंजुषा धुमाळ
डॉ. शिल्पागौरी गणपुले

२०) नाटककार रॉय किणीकर : एक अवलिया चित्रकार — प्रा. संजीवनी वाघ – रणपिसे /८३
२१) पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचे शैक्षणिक योगदान — प्रा. कुंदा कवडे /८५
२२) गणपतराव बालवडकर : समाज परिवर्तन करणारे नेतृत्व — प्रा. शांताराम पोखरकर /८९
२३) 'बारोमास' कादंबरीची वाङ्मयीन वैशिष्ट्ये — प्रा. रामेश्वर चाटे /९३
२४) देश–विदेशातील साहित्यिक, समाजसुधारकांचे योगदान — प्रा. विवेक खटवटे /९७
२५) शिक्षणप्रेमी संतोषजी खांडगे यांचे शैक्षणिक योगदान — प्रा. वैशाली पाटील /१०१
२६) डॉ. द. ता. भोसले यांचे मराठी साहित्यातील योगदान — प्रा. शिवाजीराव बागल /१०५
२७) गोमंतकातील विकास पुरुष : श्री. रवी सीताराम नाईक — प्रा. प्राची जोशी /१०९
२८) विदेशातील शास्त्रज्ञ फ्रांस्वाज बारे सिन्नूसी यांचे योगदान — प्रा. विजया सुकाळे /११३
२९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार व कार्य — प्रा. रघुनाथ घाडगे /११७
३०) भारतीय चित्रकलेतील प्रसिद्ध चित्रकार राजा रवी वर्मा यांचे योगदान — प्रा. संजय भालेराव /१२१
३१) डॉ. आनंद यादव यांचा साहित्य प्रवास — प्रा. सायली लाखे – पिदळी /१२५
३२) डॉ. जयंत नारळीकर यांचे मराठी साहित्यातील योगदान — प्रा. प्रिया नेर्लेकर /१२९
३३) डॉ. वसंतराव पवार : एक प्रयोगशील शिक्षणतज्ज्ञ व अनोखे समाजसेवक — प्रा. संगीता चव्हाणके /१३३
३४) संत चोखामेळा यांचे मराठी साहित्यातील योगदान — प्रा. सीमा म्हस्के /१३७
३५) सौ. आनंदीबाई शिर्के यांचे साहित्यातील योगदान — प्रा. सुषमा जाधव /१४१
३६) महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार आणि कार्ये — प्रा. विकास कसबे /१४५

ஜ स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. १२७६

ஜ देश – विदेशातील साहित्यिक, समाज सुधारक, संशोधक आणि शास्त्रज्ञ यांचे योगदान – भाग चार
(समीक्षा – संदर्भ)

ஜ **प्रकाशक आणि मुद्रक :**
डॉ. एल. व्ही. तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे – ४११ ०३०.
स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३६९६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
ई–मेल : snehaltawre@gmail.com

ஜ © S.R.I.

ஜ **प्रथमावृत्ती :** ८ फेब्रुवारी २०१९,
१६ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

ஜ **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

ஜ **अक्षरजुळणी :** एस. एस. ग्राफिक्स, पुणे

ஜ **मुद्रणस्थळ :** स्मिता प्रिंटर्स, पुणे

ஜ ISBN 978-93-87628-44-1

ஜ **पृष्ठसंख्या :** १५२

ஜ **मूल्य :** ₹ २००/–
$ 3

# पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचे शैक्षणिक योगदान

**प्रा. कुंदा बाळासाहेब कवडे**

शनिवार दि. ५ मे १९३२ रोजी पद्मश्री विठ्ठलरावांच्या दुसऱ्या पत्नीच्या, द्रौपदाबाईच्या पोटी मुलगा जन्माला आला. पाप-पुण्याचा झाडा घेताना ज्याच्या न्यायाचा तराजू कधीही कोणापुढे झुकला नाही, अशा तेजस्वी सूर्यपुत्र शनी देवाचा वार याच दिवशी विखेंच्या कुळाची पताका रोवणाऱ्या कुलदीपकाचा जन्म झाला. या मुलाचे पाळण्यातले नाव एकनाथ, विखे घराण्याचा पहिला अंकुर म्हणून मोहरलेला हा मुलगा पुढे 'बाळासाहेब' या नावाने वाढीस लागला. जन्माला येणार प्रत्येक जीव स्वत:चे नशीब घेऊन जन्माला येतो म्हणतात, ''त्याच्या कपाळावर त्याची नियती कोरलेली असते. ती त्याला चुकत नाही. बाळासाहेब कोणते विधीलिखित घेऊन जन्माला आला असेल ?'' त्यांच्या वडिलांनी विठ्ठलरावांनी त्यांची नियती ठरवून टाकली होती. आपल्या लेकराचे भविष्य घडविताना म्हणत होते, ''कुळीचा झेंडा खांद्यावर फडकावित याने माळ शिवारात झाड होऊनच जगलं पाहिजे !'' बाळासाहेबांचे भविष्य येणारा काळच ठरविणार होता. आपल्या मुलाने बाळासाहेबाने शिकावे मोठे व्हावे असे विठ्ठलरावांना मनापासून वाटत होते. बाळासाहेब मात्र शाळेपेक्षा गुराढोरांत, शेतीशिवारात अधिक रमत होते. अडाणी राहिल्यावर शेतकऱ्यावर घरं दारं विकण्याची कशी वेळ येते हे विठ्ठलराव दररोज बघत. तशी वेळ बाळासाहेबांवर येऊ नये म्हणून त्याने शिकलं पाहिजे म्हणून विठ्ठलरावांनी बाळासाहेबांना शिक्षणासाठी संगमनेरच्या पेटीट हायस्कूलमध्ये दाखल केले. प्रवरा कुशीत जन्माला आलेला सुपुत्र अवघे दहावीचे शिक्षण पूर्ण झाल्यावर शेती करू लागले. आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे ते सुपुत्र होते.

हे सुपुत्र शेती करत असतानाच सहकाराचे बाळकडू आपल्या घरातच त्यांना मिळाले. सहकारातील दुसऱ्या पिढीत प्रवरा कारखान्याचे अध्यक्ष झाले. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. यावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यामुळे त्यांनी इंग्रजी माध्यमाची पहिली शाळा काढली. प्रवरानगर येथे अभिमत विद्यापीठाची स्थापना केली.

त्यांनी ज्ञानमार्गाचा जो वटवृक्ष लावला त्या वटवृक्षाच्या फांद्या आज सगळीकडे फैलावल्या आहेत. त्या ज्ञानरूपी वटवृक्षाची पारंबी कोणती आणि खोड कोणते हे ओळखणे कठीण झाले आहे. त्या पारंब्यांपैकी एक पारंबी म्हणजे आमचे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी. शिक्षण संस्थांचे जाळेच त्यांनी प्रवरा शिक्षण संस्थांच्या माध्यमातून उभारले. पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटलांच्या शैक्षणिक कार्याची ओळख आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

बाळासाहेबांचे शिक्षण क्षेत्रातील अभ्यासपूर्ण कार्य हे उल्लेखनीय असेच होते. ज्ञानवंतांच्या मांदियाळीत बाळासाहेब हे शोभणारे चमचमते रत्न होते. साहित्यिक विद्वानांचे समर्थक होते. साहेब, तुम्ही प्रकाश पेरून गेलात आणि ठरलात बुद्धिवंत–कीर्तिवंत साहेबांचा समाजाशी संवाद व संपर्क हे शक्तिस्थळ होते. समाजात लोकशिक्षण त्यांनी घडविले. शैक्षणिक क्षेत्रात परिवर्तनाचे काम बाळासाहेबांनी केले, शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती होऊ शकत नाही हे साहेबांनी ओळखले होते. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी १९६४ साली प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेची स्थापना केली. पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटलांनी या संस्थेच्या माध्यमातून शिक्षण संस्थांचे जाळेच उभारले. पद्मश्रींनी सुरू केलेल्या शिक्षण संस्थेचे शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासाचे स्वप्न खऱ्या अर्थाने संस्थेचे अध्यक्ष म्हणून बाळासाहेबांनी पूर्ण केले.

शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांना गावामध्ये शिक्षणाची सुविधा निर्माण व्हावी यासाठी सहकार महर्षी पद्मश्रींनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी १९६४ साली इंग्रजी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून प्रथमच 'प्रवरा पब्लिक स्कूल' सुरू केले. काळानुरूप वेगवेगळे प्रयोग, उपक्रम राबवित प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचा विस्तार एखाद्या वटवृक्षाप्रमाणे उभा आहे. शंभराच्यावर विविध शाखा उदा. तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र, औद्योगिक प्रशिक्षण, डेअरी, कृषी, कला, वाणिज्य महाविद्यालय, विविध हायस्कूल, निवासी मुला–मुलींसाठी इंग्रजी, मराठी माध्यमाच्या शाळा आज ग्रामीण भागात कार्यरत आहे.

या शैक्षणिक संस्थांमध्ये ४२००० च्या वर विद्यार्थी बालवाडी ते पीएच.डी. पर्यंत शिक्षणाच्या उपलब्ध असलेल्या सुविधांचा फायदा घेत आहे. विशेष म्हणजे ५० टक्क्यांपर्यंतचे मुलींचे प्रमाण वाखाणण्यासारखे आहे. महाराष्ट्रात तंत्र शिक्षणाच्या अपुऱ्या असणाऱ्या सुविधांमुळे अनेक होतकरू मुलांना त्यांचे पालक शेजारच्या राज्यात विशेषत: कर्नाटकमध्ये पाठवत. त्यामुळे इच्छा असूनही विद्यार्थी तंत्र शिक्षणापासून वंचित राहत. या बाबींचा विचार बाळासाहेबांनी केला आणि त्यांच्या दृष्टिकोनातून १९८१ साली महाराष्ट्रात खाजगी विना अनुदानित तत्त्वावर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्र शिक्षण सुरू करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे

ठेवण्यात आला. ग्रामीण भागात हा प्रयोग यशस्वी होईल की नाही अशी शंका घेणाऱ्या सरकारला साहेबांनी पूर्ण विश्वास देऊन १९८१ साली लोणीसारख्या एका खेड्यात तंत्र शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. अवघ्या दोन वर्षांत हा प्रयोग यशस्वी झाला. हे बघून अनेक खाजगी विना अनुदानित तंत्र निकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्रात सुरू करण्यास परवानगी दिली. या यशस्वी प्रयोगानंतर ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अभियांत्रिकी, औषध निर्माण, वास्तुशास्त्र, शेती महाविद्यालय सुरू करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च व तंत्र शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. याचा परिणाम म्हणून शेतकरी कुटुंबातील युवक-युवती विविध राज्यातच नव्हे तर देशाबाहेरसुद्धा उच्च पदावर काम करत आहेत.

लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे म्हणतात, ''लखनौ येथे स्वतंत्र विद्यापीठ व्हावे, ही बाळासाहेबांची इच्छा होती. त्यांनी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केले. शिक्षण क्षेत्रातील राजकारणातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व आज आपण हरवून बसलो आहोत.''

अस्तित्ववादाचे मानसशास्त्रीय रूप म्हणजे मानवतावादी मानसशास्त्र तज्ज्ञ, प्रभावशाली लोकशास्त्रज्ञ म्हणून स्वर्गीय खासदार बाळासाहेबांचा इतिहास बघावा लागेल. बाळासाहेबांचा बुध्यांक अनाकलनीय होता. त्यांचे निर्णय, धडाडी, न्याय करण्याची हातोटी, सक्षम आकलनशक्ती, उपेक्षितांसाठी लढताना परिणामांची परवा न करता आव्हानांना प्रतिकार करण्याची ताकद, जटिल प्रश्न सोडविताना पेचप्रसंगावर सहज मात करण्याची कुशलता या गोष्टी सर्व काही सांगून जातात, ते शेतकऱ्यांचे साहेब होते. दीनदुबळ्यांचे, वंचितांचे, पीडितांचे, शोषितांचेही साहेब होते. दुर्लक्षितांचेही साहेब होते. सर्वांच्या अस्तित्वासाठी साहेबांनी जीवन समर्पित केले.

पद्मभूषण बाळासाहेबांचे कार्य हे कृषी, सहकार, ग्रामीण विकास, शिक्षण, आर्थिक आदी क्षेत्रात दिशादर्शक आहे. पद्मश्री विठ्ठलरावांचा वारसा समर्थपणे पार पाडून परिपूर्ण ग्रामविकासाचे एक आदर्श मॉडेल सादर केले होते. राजकारण व खासदारसाहेब हा संशोधनात्मक विषय होता.

राज्य आणि देश पातळीवरील अनेक संस्थांवर पदाधिकारी या नात्याने केलेल्या भरीव कार्याची दखल घेऊन कृषी विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टरेट' देऊन गौरव केला. तर भारत सरकारने २६ जानेवारी २०१० साली 'पद्मभूषण' किताब देऊन सन्मान केला. तरी सामान्य जनतेने दिलेली 'खासदारसाहेब' ही संबोधनात्मक पदवी अतूट जिव्हाळ्याची आहे. पाच दशकांतील त्यांचे कार्य सामान्यांचे आधार आहे.

बाळासाहेब विखे पाटील हे एक अजब रासायन होते. राजकारणात अवश्य सर्व गुण, कमालीचा संयम, धूर्तपणा, अभ्यासू वृत्ती, गुणग्राहकता, संघटन कौशल्य,

गोपनीयता हे गनिमी पद्धतीचे होते. दबा धरून योग्य वेळ साधणे हे कौशल्य या गुणवैशिष्ट्याच्या बळावर त्यांनी नगर जिल्हाच नव्हे तर राज्य व केंद्रीय पातळीवर ठसा उमटविला. अवघे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झालेल्या बाळासाहेबांनी आय.ए.एस. अधिकाऱ्यांशी उपस्थित इंग्रजीत संवाद साधण्याचे कौशल्य आत्मसात केले. त्यांचा साधेपणा ही बाळासाहेबांची ओळख होती. डोक्यावर टोपी, अंगात सदरा व मफलर घातलेले. बाळासाहेबांची ओळख संसदेत परखड व अभ्यासपूर्ण भाषणांनी होती.

बाळासाहेबांनी अखेर आपल्या प्रगल्भ बुद्धीने, नेतृत्वाने, स्वकर्तृत्वाने, सहकाररूपी वटवृक्षाच्या छायेत प्रतिभासंपन्न विद्वानांच्या सहवासात युवकांच्या ध्येयपूर्ती गरुडझेपेत परमसुख शोधले. पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या समर्पित नेतृत्वाची अखेर दि. ३० डिसेंबर २०१६ च्या सायंकाळी प्रवरानगर येथे या झंजावाताने अखेरचा निरोप घेतला. एका संघर्षमय जीवनाचा शेवट झाला. काळाला थांबविता येत नाही. त्याची पावले मागे वळवली जात नाही. या वार्तेने जनसागर दुःखात बुडाला. या आधारवडाला समाज पोरका झाला. साश्रुनयनांनी प्रचंड जन समुदायाने राज्य व देश पातळीवरील नेत्यांनी आपल्या भावना सर्वकाही सांगून गेल्या. असा हा प्रवरेचा महान सुपुत्र अनंतात विलीन झाला.

सहकारशिक्षण, राजकारण, समाजकारण, ग्रामीण विकास, पाणी प्रश्न या सर्वच क्षेत्रात बाळासाहेब विखे पाटील यांचे कार्य मोठे होते. पाणी प्रश्न हा जिव्हाळ्याचा प्रश्न होता. शेतकरी, कष्टकरी यांच्या प्रश्नांसाठी झटणारा नेता म्हणून त्यांची ओळख होती. प्रवरानगर म्हटले की विकासाचे समृद्ध बेट अशी ओळख राज्यात आणि देशात निर्माण केली. सहकार क्षेत्र टिकले तरच शेतकरी टिकेल आणि त्यातून शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेतील अशी आग्रही भूमिका त्यांची होती. त्यांच्या कार्याबद्दल भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' किताब देऊन गौरविले.

## संदर्भ सूची –

१) 'लोकसत्ता' १ जानेवारी २०१७ वर्तमानपत्रातील लेख
२) 'महामेरू' - डॉ. राजेंद्र वडमारे, मीरा बुक्स ॲन्ड पब्लिकेशन
३) 'लढत' शिवाजी सावंत – प्रवरा प्रकाशन, प्रवरानगर
४) 'महाराष्ट्र टाईम्स', ३१ डिसेंबर २०१६, वर्तमानपत्रातील लेख.

पुणे जिल्हा शिक्षण संस्थेचे प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, पुणे
आणि स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्युट, पुणे
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय १६ वी परिषद



'देश आणि विदेशातील साहित्यिक, समाजसुधारक, संशोधक आणि शास्त्रज्ञ यांचे योगदान' या परिषदेत पुस्तकाचे प्रकाशन करताना डावीकडून डॉ. शिल्पागौरी गणपुले, डॉ. मंजुषा धुमाळ, डॉ. स्नेहल तावरे, पद्मश्री श्री. अरुण फिरोदिया, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. मनोहर चासकर, डॉ. मधुमती कौजुल (मॉरिशस), डॉ. लक्ष्मी झमन (मॉरिशस), मागील बाजूस श्री. जी. बी. सोनगावकर (झांबिया), श्री. विश्वास शिंदे (दुबई) आणि श्री. विश्वदीप करमचंद (मॉरिशस).



मा. डॉ. पंडित विद्यासागर आणि पद्मश्री श्री. अरुण फिरोदिया यांचा सत्कार करताना प्राचार्य मनोहर चासकर आणि डॉ. स्नेहल तावरे.



मा. डॉ. शरद गाडेकर परिषदेत मार्गदर्शन करताना, डावीकडून डॉ. शिरीष लांडगे, डॉ. प्रशांत मोटे, डॉ. स्नेहल तावरे आणि आंतरराष्ट्रीय मान्यवर.



या परिषदेला उपस्थित असलेल्या आंतरराष्ट्रीय पाहुण्यांसोबत परिषदेचे मान्यवर.



आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषदेतील व्याख्यानांचा आस्वाद घेताना निमंत्रित.

स्नेहवर्धन
प्रकाशन

ISBN 978-93-87628-44-1


मूल्य ₹200/- $ 3

20th International Interdisciplinary Conference, Goa

२० वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, गोवा

# 'The Cultural Contribution of Sanyukta Maharashtra Movement and Goa Liberation Movement at National and International Levels'

## 'जागतिक स्तरावर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि गोवा मुक्ती संग्राम यांचे सांस्कृतिक योगदान'



Editor-
**Dr. Snehal Tawre**
Organizer-
**Dr. Vrinda Borker**

संपादक | संयोजक
डॉ. स्नेहल तावरे | डॉ. वृंदा बोरकर

ଔ **Snehavardhan Prakashan : No.** 1281

ଔ ***'The Cultural Contribution of Sanyukta Maharashtra Movement and Goa Liberation Movement at National and International Levels'***

ଔ **'जागतिक स्तरावर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि गोवा मुक्ती संग्राम यांचे सांस्कृतिक योगदान'** (समीक्षा - संदर्भ)

ଔ **Publishers & Printers :**
**Dr. L. V. Tawre**
Snehavardhan, 863 Sadashiv Peth,
Behind Mahatma Phule Sabhagruh,
Pune - 411 030. India
Office : (020) 2447 25 49 / 2443 69 61
Mobile : 9423643131 / 9075081888
Email : snehaltawre@gmail.com

ଔ **© S.R.I.**

ଔ **First Edition :** 7th December 2019
20th International Interdisciplinary Conference, Goa

ଔ **Cover By :** Santosh Ghongade

ଔ **Type Setting :** Sunita Parnerkar

ଔ **Printed By :** Smita Printers, Pune

ଔ **ISBN 978-93-87628-74-8**

ଔ **Pages : 266**

ଔ **Price : ₹ 350**
**$ 5**

# अनुक्रमणिका


- संपादकीय – डॉ. स्नेहल तावरे
– डॉ. वृंदा बोरकर/९

१. गोवा - इतिहास आणि संस्कृती – डॉ. नीला पांढरे/११

२. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणि यशवंतराव चव्हाण – डॉ. स्नेहल तावरे/१५

३. मला उमजलेले सामर्थ्यशाली व्यक्तिमत्त्व : यशवंतराव चव्हाण – डॉ.मधुमती कौंजुल (मॉरिशस)/१९

४. साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान – डॉ. कुंदा कवडे/२३

५. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान – डॉ. दीपक सूर्यवंशी/२७

६. प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांचे कार्यकर्तृत्व आणि गोवा मुक्ती संग्राम – डॉ. गीता येर्लेकर/३१

७. संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि मराठी वृत्तपत्र – डॉ. भारती नवथर/३५

८. अण्णा भाऊ साठे यांची संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील मौलिकता – डॉ. दादाराव गुंडरे/३९

९. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे – डॉ. नितीश सावंत/४३

१०. गोवा मुक्तिसंग्रामातील स्त्री योगदानाची चिकित्सा – डॉ. वृंदा केळकर/४७

११. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील लोकशाहीर अमर शेख - एक धगधगता अंगार – डॉ. निवृत्ती कार्वेकर/५१

१२. गोवा मुक्ती संग्राम आणि 'पोर्तुगेज मराठा संबंध' – डॉ. अपूर्वा बेतकेकर/५५

१३. यशवंतराव चव्हाण यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील सांस्कृतिक योगदान – डॉ. अतुल चौरे/५९

१४. संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि मुंबईचा प्रश्न – डॉ. मंजिरी कारेकर/६२

१५. गोवा मुक्ती संग्रामातील मामासाहेब क्षीरसागर यांचा सहभाग – डॉ.मंदा नांदुरकर/६६

# साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान

– डॉ. कुंदा कवडे

संयुक्त महाराष्ट्र चळवळील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व साहित्यिक कवी, विचारवंत, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्म सांगली जिल्ह्याच्या 'वाळवा' तालुक्यातील 'वाटेगाव' या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव साठे. आईचे नाव वालूबाई साठे होते . साठे हे शाळेत शिकलेले नाही. केवळ दीड दिवस ते शाळेत गेले नंतर सवर्णाद्वारे होणाऱ्या भेदभावामुळे त्यांनी शाळा सोडून दिली. त्यांनी दोन लग्न केली. त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे; तर दुसरी जयवंता साठे. त्यांना एकूण तीन अपत्ये होती मधुकर, शांता आणि शकुंतला. १ ऑगस्ट १९२० रोजी जन्मला आलेली ही व्यक्ती चौथीपर्यंत शिक्षण घेऊन पोट भरण्यासाठी मुंबईत आली. दुकानाच्या पाट्या वाचता वाचता ती लिहायला शिकली आणि कामगार चळवळीकडे ओढली गेली. त्यानंतर खऱ्या अर्थाने त्यांच्यातील शाहीर फुलला. जगातील अनेक विषयांवर पोवाडे लिहिले. त्यामध्ये नानकिन नगरापासून मुंबई तसेच काळ्याबाजारावरही लिहिले आहेत .

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. याच दिवशी मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा दिला गेला. मराठी भाषकांचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्यासाठी 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' हा लढा उभारला गेला.महाराष्ट्र राज्यात मराठी भाषा बोलणारे मुंबई, कोकण, देश विदर्भ, मराठवाडा, खानदेश, महाराष्ट्राबाहेर असलेले डांग, बेळगाव, निपाणी, कारवार व बिदर हे भाग अभिप्रेत होते. सांस्कृतिक, साहित्यिक, वैचारिक, राजकीय या सर्व अंगांनी ही चळवळ उभी राहिली.

ब्रिटिशांनी आपल्या राज्यकारभारासाठी भारताची विभागणी वेगवेगळ्या प्रांतात केली होती, परंतु ती भाषेप्रमाणे नव्हती. इ.स. १९२० रोजी नागपूर येथे काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी भाषांवर प्रांतरचनेचा मुद्दा महात्मा गांधींनी मान्य केला. लोकमान्य टिळक भाषावार प्रांतरचनेच्या बाजूने होते. मुंबईतील भांडवलदारांना जे मुख्यतः अमहाराष्ट्रीय होते त्यांचा मुंबई महाराष्ट्राला द्यायला कडाडून विरोध होता.

इ.स. १९४६ रोजी साहित्य संमेलन माडखोलकरांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापना झाली. संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या तीन ठरावांना राजकीय नेत्यांनी पाठिंबा दिला. इ.स.१९४६ रोजी भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेत स.का.पाटील यांनी मुंबईला महाराष्ट्राची राजधानी करण्यास विरोध झाला. डाव्या पक्षांनी मुंबईसह महाराष्ट्राला पाठिंबा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला पाठिंबा दिला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पक्ष संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक घटक पक्ष होता. स्वातंत्र्यानंतर भाषिक राज्याची मागणी होऊ लागली. गुजरात, महाराष्ट्र आणि मुंबई अशी त्रिराज्य योजना जाहीर केली या योजनेत महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्यामुळे अन्यायाची भावना मराठी माणसात पसरली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीने पेट घेतला. 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे'. हे या आंदोलनाचे घोषवाक्य होते. महाराष्ट्रीय काँग्रेस नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वासमोर गुडघे टेकले. यामुळे काँग्रेस नेते जनतेच्या नजरेतून उतरले. काँग्रेसस्तरांनी संयुक्त महाराष्ट्राचा लढा हातात घेतला सेनापती बापट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एस. एम जोशी, प्रल्हाद केशव अत्रे, श्रीपाद डांगे, शाहीर अमर शेख, भाई उद्धवराव पाटील, प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे चळवळीतील महत्त्वाचे नेते ठरले. एस. एम .जोशी, श्रीपाद डांगे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. प्र. के. अत्रे यांनी आपल्या मराठा दैनिकात संयुक्त महाराष्ट्राचा जोरदार पुरस्कार केला त्यांच्या भाषणातून संयुक्त महाराष्ट्राला विरोध करण्याचा खरपूस समाचार घेण्यात आला. शाहीर अमर शेख, शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर गव्हाणकर यांनी आपल्या कलाविष्काराने मराठी अस्मिता जागृत ठेवली संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णा भाऊ साठे यांचे योगदान मोठे आहे. या चळवळीत राजकीय नेते, पत्रकार, साहित्यिक, कामगार वर्ग, शाहीर, विद्यार्थी वर्ग, सामान्य स्त्री पुरुष ही सर्व मंडळी एकत्र आली. आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे यांच्या वाणीतील, लेखणीतील निखारे पाहायला मिळतात. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन म्हटले की, प्रथम आचार्य अत्रे व शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे ही नावे प्रामुख्याने नजरेसमोर येतात. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी ज्यांनी उभा महाराष्ट्र गाजविला, पेटविला व जागविला यामध्ये शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी लेखणी आणि अमर शेख यांच्या वाणीचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या लेखणीने व वाणीने लढणारे नेते, पत्रकार तसेच डफावर थाप देताना उभा आडवा महाराष्ट्र जागा करणारे शाहीर हे या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचे खरेखुरे नायक आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात आणि गोवामुक्ती आंदोलनात शाहिरांनी जागल्याचे काम केले आहे. स्वातंत्र्य मिळवण्यापूर्वी तमाशा व पोवाडे याकडे हीनतेने पाहणारा वर्ग मोठा होता. त्यामुळे त्याचे असामान्य

कर्तृत्व मान्य करायला कोणीच तयार नव्हते. अण्णा भाऊ साठेंसारख्या शाहिरांच्या पोवाड्याने व लोकनाट्यानी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात रण माजविले त्यामुळे अण्णा भाऊ साठे यांना समाजात मान्यता मिळत गेली. वर्तमानपत्रांचा असा प्रसार झालेला नव्हता गावोगावी सारीच पत्रे जाऊन पोहोचली नव्हती. आकाशवाणीवरील कार्यक्रम हे सरकारच्या नियंत्रणानुसार चालत असत. लढ्यात सहभागी झालेला वर्ग हा प्रामुख्याने शेतकरी व कामगार वर्ग होता. तो अशिक्षित होता, त्यांच्यात जागृती निर्माण करण्यासाठी दृकश्राव्य अशा पोवाडे व व लोकनाट्याचा उपयोग फार महत्त्वाचा ठरला. हे कार्य शाहिरांनी बिनबोभाटपणे पार पाडले. शाहिरांच्यामुळेच हा लढा शाहिरी डफ व बुलंद आवाजाने कामगार वस्तीतून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला होता. महाराष्ट्राच्या शाहिरांनी संयुक्त महाराष्ट्राच्या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात जे परिवर्तनाचे रान उठवले त्यांचे कार्य अविस्मरणीय आहे. महाराष्ट्र ते कधीच विसरणार नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात त्यांनी आपली लेखणी झिजविली. आपल्या वाणीचा शस्त्रासारखा वापर केला. महाराष्ट्राची अस्मिता जागती ठेवण्याचे कार्य केले. घराकडे दुर्लक्ष करून अण्णांनी लढ्याला सर्वस्व वाहिले होते. कुठलीही अपेक्षा न धरता ते गावोगावी फिरत. लोकांच्यात जागृती करीत असते. महाराष्ट्रावर झालेल्या अन्यायाची जाणीव ते लोकांना करून देत असत. अण्णा भाऊ साठेंसारख्या अनेकांना त्यांच्या हयातीत मोठेपण मिळाले नाही, त्यांची भारतीय इतिहासात नोंद नाही याचे दु:ख आहे.

अण्णा भाऊ साठे हे खऱ्या अर्थाने लोकलेखक होते. महाराष्ट्राची शाहिरी परंपरा समृद्ध करण्याचे काम त्यांनी केले. अण्णा भाऊंनी ही परंपरा अधिक संपन्न केली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आपल्या आवाजांनी संबंध आकाशच पेटवून दिले. अण्णा भाऊंचा जो हात डफावर पडला त्याच हातांनी त्यांनी पोवाडे लिहिले. आपल्या प्रतिभेने त्यांनी काळाच्या छातीवर महाराष्ट्राच्या अस्मितेची लेणी खोदली. महाराष्ट्राच्या इतिहासावर त्यांचे प्रेम होते. मराठी भाषेचा त्यांना अभिमान होता. मराठी माणसाच्या गाथा गाण्यात धन्य होते. 'जगातल्या कामगारांनो एक व्हा' ही कार्ल मार्क्सची हाक त्यांच्याही कानावर पडली होती. कामगार हा उद्याच्या इतिहासाचा नायक आहे असा त्यांना विश्वास होता. भांडवलशाही नष्ट होऊन कामगारांचे राज्य स्थापन होईल, या आशेने ते आपली लेखणी चालवत. 'मुंबईचा गिरणी कामगार' हा पोवाडा तर गिरणी कामगारांचा प्रेरणा स्त्रोत होता. त्याचा आवाज हा दलित शोषितांचा आवाज होता. जो जो शोषित व पीडित तो तो दलित समाजाच्या तळागाळातला माणूस हा त्यांच्या साहित्याच्या विषय होता. तो त्यांच्या कथा कादंबऱ्याचा नायक होता. मार्क्स तत्त्वज्ञान प्रिय होते. बाबासाहेबांची प्रेरणा होती. दलितांच्या बाजूने ते ठामपणे उभे होते. अण्णा भाऊंचे समग्र साहित्य

क्रांतिप्रवण होते. हाडाचे शाहीर व साहित्यिक होते. अण्णा भाऊंना सौंदर्य दृष्टी होती. प्रत्येक लेखकांना स्वतःची भूमिका असते. फारसे शिकलेले नव्हते तरीही त्यांनी आपल्या लेखणीतून शब्दप्रपंच केला. वाङ्मयाला ते तिसरा डोळा मानत असत. 'फकीरा' या कादंबरीला वि.स.खांडेकरांनी प्रस्तावना लिहिली, या लेखकाला प्रतिभेचे देणे आहे. अण्णा भाऊ साठे हे झपाटलेले लेखक आहेत. समाजातले वास्तव त्यांनी साहित्यात उतरविले. अण्णा भाऊंच्या कथा, कादंबऱ्या संघर्षाचे विज्ञान विशद करतात. संघर्षाशिवाय समाज परिवर्तन होऊ शकत नाही. म्हणून साहित्यात संघर्ष विविध पातळ्यावर दिसून येते. त्यांच्या साहित्यात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी दिलेल्या योगदानाची जाणीव होते.

अण्णा भाऊंच्या साहित्याचा 'गौरव' महाराष्ट्रातील जनतेने त्यांच्या जिवंतपणीच केला. पण शासनाने त्यांच्या 'फकिरा' कादंबरीला पारितोषिक देण्याशिवाय काहीच केले नाही. त्यांचे बरेच साहित्य प्रसिद्ध आहे. पण बरेच साहित्य अप्रकाशित आहे. त्यांच्या साहित्याची जपवणूक करणे आपले कर्तव्य आहे. अण्णा भाऊंची 'फकिरा' ही कादंबरी डॉ. आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली होती. अण्णा भाऊंच्या साहित्यात संघर्ष विद्रोह प्रकर्षाने जागोजागी जाणवतो. समाजातील दलित शोषित जनतेने जातपात, धर्म, मानपान यांचा त्याग करावा व एका समतेवर आधारित समाज निर्माण करण्यात पुढाकार घ्यावा असे अण्णा भाऊंना वाटत होते. अण्णा भाऊ साठेंचे नाव घेतल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास पूर्ण होणार नाही . संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील एक महारथी, लोकशाहीर, साहित्यसम्राट अण्णा भाऊंनी अमरशेख यांच्या साथीने सारा महाराष्ट्र जागविला, पेटविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, ''मार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवील पण माणूस म्हणून जगण्याचा प्रश्न शिल्लक राहतोय आणि मला भाकरीपेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे.'' या विचाराने अण्णा भाऊ भारावून गेले. हा स्वाभिमान त्यांनी निर्माण केलेल्या पात्रांतून आपले अस्तित्व दाखवू लागला. अण्णा भाऊंनी उभ्या आयुष्यात मुख्यतः दोन गोष्टींचा तिटकारा केला. एक म्हणजे श्रीमंत लोकांकडून होणारे गरिबांचे शोषण आणि अस्पृश्य बांधवांची होणारी धार्मिक, सामाजिक पिळवणूक या गोष्टींवर अण्णा भाऊंनी आपल्या लेखणीने सतत कोरडे ओढले, प्रहार केले. जनसामान्यांच्या या लोकशाहीराचे १८ जुलै १९६९ रोजी निधन झाले.

## संदर्भ सूची -

1) संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज : संपादक प्रा. भगवान काळे.
2) https://www.youtube.com : watch
3) फकिरा कादंबरी, अण्णा भाऊ साठे.

## २० वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, गोवा





स्नेहवर्धन प्रकाशन

ISBN 978-93-87628-74-8
Price: ₹ 350/- $ 5

# PRINTING AREA®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-81, Vol-04 October 2021



ISSN 2394-5303

Editor
Dr.Bapu G.Gholap

# INDEX

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

01) ROLE OF YOGA IN COVID- 19
**Dr Leela Bansode, Vaijapur.** ||10

02) The Aftermath Of COVID 19: Management of Anxiety .....
**Prof. V. M. Deshmukh,Khamgaon, Dist Buldana** ||12

03) Future Opportunities & Emerging Issues in Commerce Education in India
**Dr. Vipul G. Rakholiya, Kalavad, Dist. Jamnagar** ||14

04) DELAY IN JUSTICE DELIVERY SYSTEM : CAUSES AND SOLUTION
**PRAFULL RATHI, DR. DWARIKA PRASAD, MEERUT** ||18

05) Forest Fire: Boon or Bane
**Pawan Kumar Srivastava, Bhopal, M.P.** ||23

06) Impact of mobile gaming Addiction Dimension on Depression.....
**Deepmala Sudhare (Kshirsagar), Dr.U.S. Gaikwad, Chincholi** ||29

07) Increasing Carbon Footprint : A path to ruin for Earth
**Dr. Rahul Tiwari, Kanpur, U.P.** ||32

08) Effect of Global Warning and Impact on Indian Climate
**Dr.Wagalgave H. D.,Shirur Anantpal, Dist. Latur** ||37

09) Group Discussion and its Major Components
**Seema Dhame, Pune** ||42

10) Trajectory of the notion of 'Subaltern' in Subaltern Studies
**Mr. Liladhar Shivajirao Patil., Dr. Jyoti S. Rane , Amalner** ||47

11) The Modernization in Universities library in Maharashtra – A Study
**DR. GOVIND S. GHOGARE, Nilesh P. Pawar, Rajasthan** ||50

12) १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळ आणि क्रांतीकारकांचे कार्य
प्रा. अर्जून चाटे, अळकुटी, ता. पारनेर, जि. अहमदनगर ||54

12

# १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळ आणि क्रांतीकारकांचे कार्य


**प्रा. अर्जून चाटे**

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानीत) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी ता. पारनेर, जि. अहमदनगर


***********

## प्रस्तावना

१९ व्या शतकाच्या शेवटी राजकारणात नैराश्य निर्माण झाले. यावेळी फक्त राजकारण्यांनी आश्वासने केलेली दिसतात. खऱ्या अर्थाने बघितल्यावर राष्ट्रसभेच्या स्थापनेला दोन दशके झाली. तरी सुध्दा राजकीय सुधारण हिंदी जनतेच्या हातात आलेली दिसत नाही. राष्ट्रसभेच्या अधिवेशनात हिंदी जनतेची गाऱ्हाणी मांडली जातात, वेगवेगळ्या मागण्यांचे ठराव मंजूर होऊन सरकारकडे पाठविले जात असे. परंतु सरकार दखल घेत नव्हते. असे असूनसुध्दा राष्ट्रसभेच्या प्रमुख नेत्यांनी सनदशीर राजकारणाचा त्याग केला नाही. तसेच राजकर्त्यांच्या न्यायीपणावरील त्यांचा विश्वास पुर्ण संपला नाही. ब्रिटीशांना हाकलवून लावण्यासाठी शस्त्रसामर्थ्यावर विश्वास ठेवणाऱ्या तरुणांच्या गटातून क्रांतीकारी चळवळीचा जन्म झाला.

## चळवळीची पार्श्वभूमी

हिंदी नेते हिंदूस्थानच्या राजकारणात स्थान मागू लागले. इंग्रजांचे जुलमी कायदे संपविण्याचा प्रयत्न करु लागले. यावरूनच १८८५ ला राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ सेन, पं. मालवीय व गोखले या क्रांतीकारकांनी अर्ज विनंत्याचा मार्ग स्विकारला. लोकमान्य टिळकांनी वैदिक संस्कृतीचे पुर्नजीवन करुन अभिमान हिंदी जनतेला प्रतिपादन केले. तसेच गणपती उत्सव, शिवजयंती सुरु करुन समाज जागृतीचे कार्य चालू केले. स्वराज्य हा मानवाचा जन्मसिध्द हक्क आहे, त्यासाठी आपण झटले पाहिजे, असा विचार टिळकांनी मांडला. १८५७ च्या उद्रेकापासून प्रेरणा घेऊन क्रांतीकारी चळवळीचा जन्म झाला. प्रत्येक तरुण राष्ट्रवादी होता. गुलामगिरी पेक्षा त्यांना मरण प्रिय होते.

क्रांतीकारकांची जीवन म्हणजे मश्त्यूशी खेळ होता. गुप्त संघटना उभारणे, शस्त्रास्त्रे तयार करणे, परदेशात जाऊन शस्त्रांची आयात करणे, समाजात आपल्या लिखाणाने असंतोष निर्माण करणे, इंग्रजांकडून पकडले गेल असता ते हसतमुखाने फासावर लटकत. अशा प्रकारे क्रांतीकारक आपल्या मातश्भूमीसाठी लढत असत. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील उमाजी नाईक, वासुदेव बळवंत फडके, पंजाबमध्ये शिखांची चळवळ त्यापैकी होते.

## उमाजी नाईकांचा उठाव

महाराष्ट्रात रामोसी ही एक जमात सह्याद्रीच्या कडेकपारित वस्ती करुन तसेच राखणदारीची कामे करणारी एक इमानी जात होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या वेळी त्यांना सहभागी करुन घेतले. तसेच सह्याद्रीच्या माथ्यावरच तटबंदीच्या रक्षणाची जबाबदारी महाराजांनी त्यांच्यावर सोपविली होती. मराठ्यांचे राज्य इंग्रजांनी बुडविले. रामोसी लोकांची वतने व त्यावर आधारित रोजगार बंद झाला. पारतंत्र्याची झळ रामोसी लोकांना बसली. उमाजी नाईकाचे नाव महाराष्ट्रात गाजू लागले. सुरुवातीला ते लुटमार व दरोडेखोर करणारे होते. नंतर त्यांनी ब्रिटीशांचे राज्य घालवण्यासाठी प्रयत्न करु लागले. पुणे, सातारा डोंगरी भागात त्यांनी आपले राज्य स्थापन केले. दरबार भरुन ब्राम्हणांना आपल्याकडील द्रव्ये वाटू लागले. तसेच उमाजीला पकडण्यासाठी ब्रिटीशांनी पाच — पाच हजाराचे बक्षीस लावले. १६ फेब्रवारी १८३१ रोजी उमाजांनी राजे राजवाडे, जहांगीरदार सरदार सामन्य प्रजाजन यांना उद्देशून एक जाहिरनामा काढला. त्यात ते म्हणतात, "युरोपियन लोक ते अधिकारी किंवा शिपाई असो जेथे सापडतील तेथे त्यांना ठार मारावेत, साहेबाला मारण्याचे काम जो करेल त्याला रोख रक्कम, बक्षिस, इनाम, जहागिरी देण्यात येईल. ब्रिटीशांच्या

ताब्यात असणारे वतन, हक्क व मिळकती गेल्य असतील त्यांना परत मिळवण्याची संधी आली आहे. तिचा उपयोग करुन घ्यावा. जे सरकारच्या फौजेत भारतीय शिपाई स्वार पायदळे असतील त्यांनी नोकऱ्या सोडून बाहेर यावे. साहेबांचे हुकुम पाळु नयेत, हे जो कुणा पाळीत नसेल त्यांना शिक्षा केल्या जातील. फिरंग्याचे बंगले जाळावेत, सरकारी तिजोऱ्या लुटाव्यात, लुटीचा पैसा त्यांनाच मिळेल. हिंदू–मुस्लिम सर्वांनी आमचा हुकुम पाळावा. ब्रिटीश आपले राज्य बुडविणार आहेत."

सातारा कोल्हापूरपासून सोलापूर अहमदनगर पर्यंतच्या भागात आणि कोकणात अनेक भागात उमाजी नाईकने आपल्या सैनिक तुकडीची मोठी धामधुम माजविली. ब्रिटीश अधिकारी कॅ. मॅकीन्टॉश हा उमाजीच्या पाठलागावर होता. परंतु स्वकियांच्या फितुरीने त्याला पकडले गेले. १८७६ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. लोक अन्न अन्न करुन मरु लागले. त्यातच सरकारी करांचे ओझे दिवसेंदिवस वाढत चालले. दुष्काळाच्या खाईत सापडलेल्या प्रजेंबद्दल सरकार तटस्थ होते. अशा या सरकारला धडा शिकवण्यासाठी महाराष्ट्रभर फिरुन अन्यायविरुध्द उठाव करण्याची चेतावणी ते देऊ लागले. रामोश्यांसारख्या जातीला हाताशी धरुन त्यांनी महाराष्ट्रातील सात जिल्ह्यात मोठी खळबळ माजविली. इंग्रजी कारभार कोलमडून टाकला.

**चाफेकर — रँडचा खून**

इंग्रजाच्या अन्यायाला शह देणारा हिंदी तरुणांचा वर्ग तयार झाला. इंग्रज बंदुकीच्या गोळीशिवाय वठणीवर येणार नाहीत. या भावनेने पुण्याच्या दामोदर चाफेकर या तरुणाने जुलमी प्लेग कमिशनर रँड याचा खुन केला व हा दिवस हिंदूस्थानात हिरक महोत्सवाचा दिवस म्हणून मोठ्या आनंदाने साजरा केला. १७ फेब्रुवारी १८९७ रोजी रँड साहेबाने आपल्या हाती असलेल्या अधिकाराचा गैरवापर करुन पुण्यातील नागरिकांवर अत्याचार सुरु केले होते. प्रतिबंधाच्या नावाखाली लोकामध्ये दहशत निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. क्रुर अधिकाऱ्याचा बदला दामोदर चाफेकरने घेतला. पुढे त्यांना फाशी देण्यात आली. त्यांनी महाराष्ट्रभर किर्तनाच्या माध्यमातून राष्ट्रवाद पसरवित असे ते म्हणतात, "केवळ शिवाजी महाराजांचे नाव घेऊन चालणार नाही, त्यांच्याप्रमाणे कृत्य करणे गरजेचे आहे."

**स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जवळच्या भगूर या गावी झाला. त्याचे घराणे प्रतिष्ठीत इनामदाराचे होते. सावरकरांचे माध्यमिक शिक्षण नाशिक येथे झाले. लहानपणापासून ते बुध्दीमान असल्याने सावरकर हे थोर क्रांतीकारक आणि देशभक्त म्हणून परिचित आहेत. रत्नागिरीला असताना त्यांचे सामाजिक कार्यही तितकचे महत्वाचे होते. आपल्या सामाजिक कार्याविषयी ते म्हणतात, ''माझी अशी इच्छा आहे की, मी सागरात उडी टाकली होती, ही गोष्ट लोक विसरले तरी चालेल. पण मी जे सामाजिक विचार मांडले त्याचे समाजाने स्मरण ठेवावे.''

**तुरुंगवास**

कलेक्टर जॅक्सनच्या खुन खटल्यात सावरकरांना ओढले गेले व त्यांना ५० वर्षाची शिक्षा देण्यात आली. १९११ मध्ये अंदमानात पाठविण्यात आले. यावेळी त्यांना ५० वर्षाची शिक्षा देण्यात आली. त्यांनी न्यायाधिशांना लागलीच उत्तर दिले, ''अरे! पन्नास वर्षे तरी तुमचे राज्य येथे राहिल का?'' सावरकरांचे हे भाकीत खरे ठरले. कारण त्याआधीच ब्रिटीशांनी भारताला स्वातंत्र्य दिले. पुढे १९२४ मध्ये सरकराने त्यांची मुक्तता करुन रत्नागिरीला ठेवण्यात आले. यावेळी सावरकरांनी कोणत्याही राजकिय चळवळीत पाच वर्षे सहभागी होऊ नये, अशी सरकारने अट घातली. सावरकरांचा पिंड देशभक्तीचा होता. त्यांनी समाजसुधारणेचे आंदोलन करुन देशाची सेवा करण्याचे ठरविले. समाजसुधारणा हा सुध्दा स्वांतत्र्य चळवळीचा एक भाग होता. सावरकर हे कट्टर हिंदुत्ववादी होते. तसेच ते प्रखर बुध्दनिष्ठ विज्ञाननिष्ठ होते.

**विज्ञानवादी दृष्टीकोन**

सावरकर विज्ञाननिष्ठ होते. समाजातील अनिष्ठ रुढी व परंपरा याला त्यांनी प्रखर विरोध केला. वैज्ञानिक दृष्टीकोनातून त्यांनी यज्ञ, गोपुजा, स्पर्शबंदी यावर कडाडून टिका केली. गोपुजनाची भावना सर्वस्वी त्याज्य असल्याचे त्यांनी सांगितले. पशुला देवता मानणे हा माणुसकीचा अपमान आहे. असे ते मानतात. सावरकर

असे म्हणतात की, "गाईचे शेण आणि मुत्र समारंभपुर्वक प्यायचे हा आचार (धर्म) की अत्याचार". ते म्हणतात, "शेण खत आहे ते शेतात घाला, पोटात घालू नका" अशा पध्दतीने समाजाला प्रबोधन करण्याचे काम सावरकर करत असे.

चाफेकर फाशीवर गेले त्यावेळी सावरकर कमी वयाचे होते. या घटनेचा परिणाम सावरकरांवर प्रचंड पडला. यानंतर ते म्हणतात, मातश्भूमीच्या रक्षणासाठी मी शेवटपर्यंत लढत राहिल. टिळकांच्या जहाल तत्वज्ञानाचाही क्रांतीकारी विचारसरणीवर १९०० मध्ये त्यांनी मित्रमेळा नावाची संस्था काढली. पुढे तिचे रुपांतर १९०४ मध्ये अभिनव भारत या संस्थेत झाले. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा होम करणारी शपथ अभिनव भारताच्या सभासदांना घ्यावी लागे. १९०५ च्या बंगालच्या फाळणीच्या वणव्यात मुफ्त पत्रके, सभा इत्यादी द्वारे प्रचार केला. परदेशी मालाच्या होळ्या केल्या. स्वदेशीचा पुरस्कार केला. नंतर ते इंग्लंडला गेले. मदनलाल धिंग्राने १९०२ मध्ये कर्झन वायलीला गोळी घालून ठार केले. अनंत कान्हेरेने १९०९ मध्ये जॅक्सनला ठार केले. दोघांना फाशी देण्यात आली.

अशा प्रकारे महाराष्ट्रात नव्हे तर पुर्ण भारतभर व परेदशात क्रांतीकारकांनी मोठे कार्य केले. शामजी कृष्णा वर्मा, सरदारसिंग राणा व मादाम कामा, लाला हरदयाळ इ. परदेशातही कार्य केले.

**संदर्भ ग्रंथ सुची**

1) Sudal P- – The Indian National Movement

2) Muzumdar R-C- (ED) – Struggle for Freedom

3) Verney Lovett – A History of the Indian National Movement

4) Sarkar Sumit – Modern India 1885 – 1947 1 Macmillion New Delhi

५ डॉ. पवार जयसिंगराव — हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

६ सरकार सुमित — आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, इलाहाबाद, पटना.

७ आधुनिक भारत — निराळी प्रकाशन, पुणे

**13**

# ग्रामीण विकासाकरीता एकात्मिक बाल विकास सेवा योजना

**डॉ. दिपाली श्रीराम घोगरे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. एच. एन. सिन्हा कला व वाणिज्य महाविद्यालय, पातूर जि. अकोला

**********

**प्रस्तावना :**

माणसाच्या वाढीच्या आणि विकासाच्या वाटचालीतील अत्यंत महत्त्वाचा कालावधी ही त्याची बाल्यावस्था असते. बाल्यावस्थेत मुलांचा जो शारीरिक व माणसिक विकास होतो त्यावरच त्याचा भविष्यकालीन शारीरिक व माणसिक विकास अवलंबून असतो, आणि म्हणूनच बाळ जन्माला येण्यापूर्वी आणि जन्मल्यानंतर त्याला पुरेशा सेवा देण्याकरीता देशाने राष्ट्रीय धोरण तयार केले. त्या धोरणानुसारच २ ऑक्टोबर १९७५ साली मुलांना सर्वांगिण सेवा म्हणजेच आरोग्य, आहार व शिक्षण एकत्रितपणे देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने एकात्मिक बाल विकास सेवा योजना सुरवातीला प्रायोगिक तत्वावर सुरू केली. एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र–पुरस्कृत योजना असून या योजनेची सुरूवात अमरावती जिल्ह्यातील 'धारणी' या आदिवासी व 'धारावी, मुंबई' या नागरी प्रकल्पाच्या स्थापनेपासून महाराष्ट्रात झाली. टप्प्या–टप्प्याने या योजनेच्या प्रकल्पसंख्येत वाढ झाली. आज राज्याच्या तळागळापर्यंत पोहचलेला. राज्यभरात ६५ हजार केंद्र असणारा एकात्मिक बाल विकास सेवा योजना हा गरीब कुटुंबातील महिला व मुले यांच्यासाठीचा सर्वात मोठा कार्यक्रम आहे.

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे उद्देश :**[१]

१. ० ते ६ वयोगटातील मुलांचा पोषण व आरोग्य दर्जा सुधारणे.

२. मुलांच्या योग्य मानसिक, शारीरिक व सामाजिक विकासाचा पाया घालणे.

Pay U Money
Online/Net Banking
Debit Card/Credit Card

PAYTM
Payment Accepted here
7588057695
9850203295

Indexed

IMPACT 7.891 ijif FACTOR


ISSN 2394-5303


*Edited By*
Dr. Gholap Bapu Ganpat
Parli Vaijnath, Dist.Beed 431 515
(Maharashtra, India)
Cell : +91 75 88 05 76 95



*Publisher & Owner*
Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com